# महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जमातीतील मुलांचे कल्याण: एक समाजशास्त्रीय अभ्यास

डॉ. अरूण पौडमल, समाजशास्त्र विभाग प्रमुख, यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) कॉलेज, कोल्हापूर

---

**प्रस्तावना :**

**भटक्या जमातीच्या संकल्पना :**

नोमेड या शब्दाची उत्पत्ती 'नेमो' या ग्रीक शब्दापासून झालेली असून त्याचा अर्थ भटकी गुरे पाळणारे लोक असा होतो. एन.जी.राव यांच्या मते भटक्या विमुक्त ही संकल्पना अशा सांस्कृतिक व वांशिक समूहासाठी वापरण्यात येते जो समूह परंपरेनुसार स्वत:च्या उदरनिर्वाहासाठी भटकंती करीत असतो.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी सर्वेक्षण, निरीक्षण आणि मुलाखत तंत्राचा वापर केला आहे. तसेच १०० उत्तरदात्यांकडून योगायोग नमुना निवड (Accidental sampling techniques) पध्दतीनुसार माहितीचे संकलन केले आहे. तसेच मानववंशशास्त्राच्या अभ्यासाच्या दृष्टीने वेगवेगळ्या ठिकाणांची छायाचित्रे संकलित केली आहेत.

**भारतातील विमुक्त जमाती किंवा गुन्हेगार :**

१९ व्या शतकातील ब्रिटीशांनी वसाहतवादाच्या काळात लाखो भारतीयांना त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक मागासलेपणामुळे तसेच भेदभावाच्या आधारे गुन्हेगारी प्रवृत्तीची जमात असे भटक्या विमुक्त जमातीला संबोधिले जाते. तथापि मागासलेपणा व भेदभावाची ऐतिहासिक रचना आपणांस आजही पहावयास मिळते. त्यामुळेच याचे अनिष्ठ परिणाम टाळण्यासाठी देशात व आंतरराष्ट्रीय कायद्याच्या आधारे समता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी आपण कटीबध्द आहोत. ब्रिटीशांनी (Criminal Tribes Acts)च्या आधारे भारतातील वेगवेगळ्या प्रादेशिक व प्रशासकीय घटकांमध्ये भूमिहीन भटक्या विमुक्त जमातीमधील गुन्हेगारी प्रवृत्ती नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला. १८७१ साली पारित झालेला याविषयीचा पहिला कायदा उत्तर भारतासाठी लागू करण्यात आला. त्याचप्रमाणे अशा अनेकविध कायदे, विशेषत: १९९१ चा कायदा, ब्रिटिशांची सत्ता असलेल्या संपूर्ण भारतीय भूमीवर लागू करण्यात आला.

ब्रिटिशकालीन समाजव्यवस्थेमध्ये पारित झालेल्या कायद्यांनी स्थानिक प्रशासनाला अफाट स्वरूपात अधिकार प्रदान केले. ज्याच्याआधारे विशिष्ठ अशा जमाती, टोळी तसेच वर्गाला अजामीनपात्र गुन्ह्याशी जोडले गेले. जेव्हा एखादी जमात एका विशिष्ठ अशा गुन्हेगारी वर्गाशी निगडीत आहे असे जेव्हा निदर्शनास यायचे तेव्हा त्या जमातीतील सर्व सदस्यांनी ठराविक वेळेला विशिष्ठ ठिकाणी जावून स्थानिक दंडाधिका-यासमोर आपली हजेरी लावावी लागत असे. जर एखादी व्यक्ती स्वत:ची हजेरी लावण्यास असमर्थ ठरली तर त्या संबंधित व्यक्तिवर भारतीय दंड संहितेच्या आधारे गुन्हा दाखल केला जात असे. तसेच स्थानिक प्रशासनाकडून संबंधित जमातीला कायमस्वरूपाच्या सुधारणात्मक वसाहतीमध्ये पाठवले जायचे. जर एखादया व्यक्तीने सुधारणात्मक वसाहतींमधून पलायन करण्याचा प्रयत्न केला अथवा नेमून दिलेल्या वास्तवाच्या ठिकाणापासून दूर गेल्यास त्या व्यक्तीकडून अतिशय कमी दामामध्ये श्रम करून घेतले जात होते. अशा प्रकारे संबंधित जमातीच्या लोकांना समाजोपयोगी कामामध्ये गुंतवले जायचे.

**महाराष्ट्रातील विमुक्त जमाती :**

सरकारने परंपरागत भटक्या विमुक्त जमातींचे एकूण ४२ जमातींमध्ये वर्गीकरण केलेले आहे. इ.स. १८७१ साली भारतातील ब्रिटिश सरकारने २८ जमातींना गुन्हेगारी जमात म्हणून कलंकित केले आणि त्यांनी अलगीकरण कक्षात ठेवण्यात आले. अशाप्रकारे या संबंधित जमातीमधील गुन्हेगारी कृत्यांना आळा घालणे तसेच गुन्हेगारी वृत्तीला थोपविणे शक्य आहे असा ब्रिटीश सरकारचा समज होता. भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी या गुन्हेगार म्हणून घोषित केलेल्या जमातींना मुक्त केले. गुन्हेगारीचा ठसा जो या जमातींवर पडला होता तो पुसून टाकून या जमातींना विमुक्त जाती असे नामकरण करण्यात आले. भारतातील वेगवेगळ्या परदेशातून या जमाती महाराष्ट्राकडे स्थलांतरीत होवू लागल्या. त्यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रात उत्तर भारतातून पारधी, कंजारभाट, राजपूत भामटा, छप्परबंद, वाघरीस, बंजारस इत्यादी जमाती स्थलांतरीत झाल्या आहेत. महाराष्ट्रात दक्षिण भारतातून वडार, कैकाडी, बेस्तर, मांग-गारूडी, रामोशी इत्यादी जमाती स्थलांतरीत झाल्या आहेत.

महाराष्ट्रात १८३ वेगवेगळ्या गटामध्ये भटक्या विमुक्त जमातींचा समावेश केलेला असून भटक्या विमुक्त या संकल्पनेमध्ये पुढीलप्रमाणे नमूद केलेल्या लोकांचा समावेश होतो. या जमातीतील लोकांना पूर्वीच्या काळी हिंदू धर्मामध्ये स्थान देण्यात आलेले नव्हते. हे लोक अन्न शोधण्यासाठी रानावनात भटकत होते. या लोकांना अस्पृश्य म्हणून संबोधले जात होते व सर्वसामान्यप्रमाणे जीवन जगण्यास गावामध्ये मज्जाव होता; दररोजच्या भटकंतीमुळे अशा लोकांना आपल्या दैनंदिन गरजा पूर्ण करणे अशक्य होत असे; हे लोक औपचारिक शिक्षणापासून दूर असत; त्यांच्याकडे स्थावर संपत्ती किंवा स्वत:चे असे गाव नव्हते; यांचेकडे व्यापाराची साधने नव्हती परंतु हे लोक आपल्या प्राचीन भारतीय समाजातील प्रथांचे व परंपरेची जपणूक करताना

दिसतात; सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेपणा या लोकांच्यामध्ये असतो व असे लोक झोपडीमध्ये किंवा रस्त्याच्या कडेला राहतात व कोणतेही निकृष्ट दर्जाचे काम स्विकारण्यास तयार होतात. उदा. देशी दारूचे उत्पादन, भीक मागणे, भंगार गोळा करणे, इत्यादी असे लोक बहुदा तीन दगडांच्या चुलीवर स्वयंपाक करतात. अशी अनेकविध वैशिष्ट्ये असणा-या समुदायाला भारतात तसेच संपूर्ण जगामध्ये विमुक्त भटक्या जमाती असे संबोधले जाते.

**महाराष्ट्रात भटक्या विमुक्त जमातीसाठी असलेल्या कल्याणकारी योजना :**

महाराष्ट्र सरकारने समाजकल्याण विभागांतर्गत अंमलात येणा-या विविध योजना खाली नमूद केलेल्या प्रमुख गटामध्ये विभागल्या आहेत.

१) शिक्षण
२) संशोधन आणि प्रशिक्षण
३) मानवी हक्कांचे संरक्षण
४) भिका-यांचे पुनर्वसन
५) जात प्रमाणपत्रांची पडताळणी
६) मागासवर्गाचा विकास
७) विशेष घटक योजना
८) अपंग कल्याणकारी योजना
९) निषेध प्रचार

वर नमूद केलेल्या विविध शिर्षकाखाली अनेक कल्याणकारी योजना भटक्या विमुक्त जमातीसाठी अंमलात आणल्या जातात. उदा. शैक्षणिक शिष्यवृत्ती, आश्रम शाळा, स्त्रियांसाठी हस्तकला प्रशिक्षण इत्यादी.

**कौटुंबिक पार्श्वभूमी :**

बहुतांशी भटक्या जमातीमध्ये एकत्र कुटुंब पध्दतीचा अभाव आढळतो. सर्वसाधारणपणे विवाहाचे वय १८ वर्षे गृहीत धरले जाते. विवाहानंतर कुटुंबव्यवस्थेची सर्व जबाबदारी वधूवरांना पार पाडावी लागते. भटक्या जमातीमध्ये बहुतांशी कुटुंब प्रमुखाची जबाबदारी पुरूष मंडळी पार पाडत असतात. व्यसन, आजारपण, धोक्याच्या ठिकाणी काम इत्यादी कारणास्तव मृत्यूचे प्रमाण स्त्रियांपेक्षा पुरूषांमध्ये अधिक असते. त्यामुळे भटक्या जमातीमध्ये स्त्रिया कुटुंबव्यवस्थेत फार मोलाची अधिक भूमिका पार पाडत असताना दिसून येतात.

**राहणीमान :**

भटकंती करणे हा भटक्या जमातीतील लोकांचा अविभाज्य भाग बनल्यामुळे संपूर्ण वर्षभरामध्ये किंवा सहा महिन्याच्या कालावधीमध्ये ९९.७५% लोक स्वतःच्या घरापासून दूर असतात. तसेच त्यांना स्वतःचे घर नसल्यामुळे ब-याच वेळी हे लोक स्थानिक इमारतीचा आधार घेतात. संघर्ष हा त्यांचा जीवनाचा अविभाज्य भाग असतो. व हे लोक उदरनिर्वाहासाठी भटकंती करीत असतात. भटक्या जमातीतील लोक ज्या ठिकाणी वास्तव करतात त्या ठिकाणी बहुतांशी पाणी, वीज, शौचालय, यासारख्या नागरी सुविधांचा अभाव आढळतो. स्थानिक लोकांकडून नाहक त्रास होणे ही बाब त्यांच्यासाठी नित्याचीच असते. अशावेळी एखाद्या ठिकाणी चोरी झाल्यास, संशयाची बोटे सर्वप्रथम भटक्या जमातीतील लोकांच्याकडेच दाखविली जातात. त्यामुळे भटक्या जमातीतील लोक हे पोलिस व स्थानिक लोक यांच्या दडपणाखाली वावरत असतात. त्याचप्रमाणे झोपडपट्टीत राहणा-या या लोकांना आरोग्यविषयक समस्यांना सामोरे जावे लागते. नगरपालिकेकडून पुरवल्या जाणा-या सुविधा या लोकांना पुरेशा प्रमाणात मिळत नाहीत.

**फौजदारी खटले :**

ब्रिटिशांच्या काळातील १८७१ च्या फौजदारी जमाती कायद्यानुसार आजही केवळ संशयाच्या आधारे पोलीस भटक्या जमातीतील लोकांना चोरी, दरोडा, खून, लूटमार यासारख्या गुन्ह्यांसाठी अटक करतात. त्यामुळे भटक्या जमातीतील लोक नेहमी मानसिक दडपणाखाली वावरताना पाहावयास मिळतात. एखादा व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक असलेले आर्थिक पाठबळ नसल्याने हे लोक बेरोजगार असतात. बेकारीमुळे हे लोक अवैध व्यवसायाकडे वळू लागले आहेत.

**आर्थिक स्थिती :**

भटक्या जमातीतील लोक ब-याच वेळा धर्माच्या नावाखाली भीक मागतात. तसेच काही वेळा भंगार गोळा करणे, गोंदण कोरणे, रस्त्यावर बसून वस्तू विकणे यासारखी कामे अर्थार्जनासाठी करत असतात. याउलट, लमाण, सिकलदर, वडर, राजपूत, लोहार, घिसाडी यासारख्या जमातीतील लोक अर्थार्जनासाठी भीक मागणे पसंत नसते. कठीण परिश्रम केल्यानंतर मिळणारे उत्पन्न जरी तटपुंजे असले तरी हे लोक समाधानी असतात. या लोकांचे राहणीमान दरिद्रयरेषेखालील लोकांसारखे असते.

गोपाळ, खतबू, हेळवी, बागडी, कोरवी आणि पारधी या जमातीच्या लोकांना व्यवसायासंदर्भात योग्य असे मार्गदर्शन मिळत नाही. निरक्षरतेमुळे गोपाळ जमातीच्या लोकांची शोकांतिका असते. या जमातीतील लोक शिळे अन्न मागून उदरनिर्वाह करतात. त्यामुळे त्यांना आरोग्यविषयक समस्यांना तोंड द्यावे लागते. या जमातीतील मुले गुळ तयार होण्याच्या ठिकाणी काम करतात. कित्येक प्रसंगी त्यांना उपासमारीस तोंड द्यावे लागते. बहुरूपींची मुले मुखवटा परिधान करून लोकांची करमणूक करतात व अर्थार्जन करतात. भटक्या जमातीतील ४६.८७% लोकांची स्वतःची घरे असली तरी त्यांना अर्थार्जनासाठी भटकंती कारवाई लागते. सुगीच्या काळात हे लोक धान्य गोळा करतात. तसेच शिक्षणाचा अभाव असल्याने या लोकांची प्रगती खुंटलेली असते. भटक्या जमातीतील

८९.६२% कुटुंबामध्ये एकही व्यक्ती शासकीय सेवेत कार्यरत नाही व त्यांना स्वतःच्या मालकीची जमीन नसल्याने ते दुस-याच्या शेतामध्ये कामाला जातात. भटक्या जमातीतील ४३.७५% लोक दारिद्रयरेषेखालील आहेत व त्यांचे वार्षिक उत्पन्न ५०,००० रूपयांपेक्षाही कमी आहे असे दिसून आले आहे.

**शिक्षण :**

कोल्हापूर जिल्हयातील भटक्या जमातीतील निम्म्याहून अधिक लोकसंख्या निरक्षर आहे. पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे. भटक्या जमातीतील ६४.०४% लोकांना केवल प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेले आहे. दारिद्र्यामुळे उच्च शिक्षण, तांत्रिक शिक्षण घेण्याचे प्रमाण नगण्य आहे. शिक्षण घेवून नोकरी मिळत नसल्याने शिक्षणाचा जीवनामध्ये काही उपयोग नाही अशी मनोधारणा या जमातीतील लोकांची झाली आहे. शिक्षणाबद्दलचे अज्ञान, योग्य मार्गदर्शनाचा अभाव इत्यादींमुळे पालक स्वतःच्या मुलांना शाळेत पाठवत नाहीत.

**मानसिक व सामाजिक समस्या :**

भटक्या जमातीतील लोकांच्या प्रगतीतील अडथळे गुंतागुंतीचे असल्याने त्यांचे जीवन हे नेहमी संघर्षमय असते. परंपरागातरित्या अस्तित्वात असलेल्या जमात पंचायतीचे प्रत्येक जमातीवर नियंत्रण असते. जमातीतील लोकांना जमात पंचायतीच्या नियमांचे पालन करणे बंधनकारक असते. जमात पंचायत मुलींच्या शिक्षणाचा पुरस्कार करीत नाही तसेच त्यांना समाजामध्ये बदल नकोसा असतो. पारंपारिक वारसा जपण्यास महत्व दिले जात असून आंतरजातीय विवाह, प्रथा परंपरेचे उल्लंघन, पेहरावातील बदल यासारख्या बाबींचा भटक्या जमातीमध्ये मज्जाव असतो. स्त्रियांनी अलंकार परिधान करू नयेत, विवाह खेडयापासून दूर एखाद्या झोपडीमध्ये पार पाडण्यात यावा यासारखे नियम जमातीमध्ये पहावयास मिळतात. कोल्हाटी जमातीमध्ये एखाद्याने जमातीच्या नियमांचे उल्लंघन केले तर त्या संबंधित कुटुंबाकडून दंड आकारला जातो किंवा त्या कुटुंबाला वाळीत टाकले जाते. दुसरी बाब म्हणजे  कोल्हाटी जमातीत मुलगी जन्माला आली की ढोल वाजवला जातो आनंदोत्सव साजरा केला जातो. तसेच राजकीय नेतृत्वाचा अभाव, व्यसन, अज्ञान, अंधश्रध्दा, समाज नियमनासाठी पारंपारिक पध्दतीचा वापर इत्यादींमुळे जमातीतील लोकांचे मानसिक व सामाजिक संतुलन बिघडत आहे.

**आरोग्य :**

भटक्या जमातीतील लोकांचा अलौकिक शक्तीवर खूप श्रध्दा असते. भटक्या जमातीतील लोक १००% देवावर विश्वास ठेवणारे असून मूर्तिपूजेस अनन्यसाधारण महत्व देतात. ते शकुन आणि अपशकुन यावर विश्वास ठेवतात व त्यास अनुसरून संबंधित कृती करतात. देवाच्या नावाखाली प्राण्यांचा बळी दिला जातो व अंगात येणे यासारख्या बाबींमध्ये ते विश्वास ठेवतात. वरील बाबीं व्यतिरिक्त त्यांना आधुनिक वैद्यकिय उपचार पध्दतीबद्दल जाणीव आहे. पारंपारिक मूल्यांची जपणूक करणारे हे लोक दवाखान्यामध्ये उपचार घेत असल्याचे दिसून येतात. जवळजवळ ६८.२८% कुटुंबे कुटुंबनियोजनाच्या महत्वाबद्दल अनभिज्ञ असल्याने लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. परिणामी, या जमातीतील लोकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

**कल्याणकारी योजना :**

केंद्र व राज्य सरकारने भटक्या जमातीतील लोकांसाठी जाहीर केलेल्या अनेक योजना प्रत्यक्षात संबंधित घटकांपर्यंत पोहचत नाहीत. ८३.६२% कुटुंबे ब-याच सुविधेपासून वंचित राहिलेल्या आहेत.  भटक्या जमातीबद्दलचे सरकारी अधिका-यांना असलेले अज्ञान, अकार्यक्षम अधिकारी वर्ग, सरकारी यंत्रणेचे दुर्लक्ष यासारख्या कारणास्तव शासनाच्या कल्याणकारी योजना भटक्या जमातीतील लोकांपर्यंत पोहचण्यास विलंब होत आहे. सरकारी कर्मचा-यांच्या उदासीनतेमुळे भटक्या जमातीच्या लोकांच्या विकासाची गती खुंटते. तथापि, १६.३७% भटक्या जमातीतील लोकांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेतलेला आहे.

**शिफारसी :**

प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, समाजकल्याण, सामाजिक कार्य, कायदा व न्याय इत्यादी विषयातील तज्ञांचा कक्ष असावा व त्याव्दारे शासनाच्या वेगवेगळ्या योजनांची माहिती संबंधित घटकांपर्यंत पोहचवली जावी.

भटक्या जमातीबाबत केंद्र व राज्य सरकारचे धोरण दुहेरी असल्याचे दिसून येते. भारतीय राज्यघटनेने भटक्या जमातीच्या कल्याणासाठी वेगळ्या स्वरूपात योजना जाहीर केलेल्या नाहीत. केवळ अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी कल्याणकारी योजना न राबवता भटक्या जमातीच्या समस्या जाणून घेवून त्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील असले पाहिजे. महाराष्ट्र सरकारने भटक्या जमातीच्या समस्या सोडवण्यासाठी ज्या कल्याणकारी योजना आखल्या आहेत. त्या योजनांना केंद्रसरकारने सहाय्य करणे अपेक्षित आहे. भटक्या विमुक्त जमातीच्या विकासासाठी केंद्र व राज्य सरकार यामध्ये समन्वय असणे अपेक्षित आहे.

समाजकल्याण विभागाने भटक्या जमातीच्या लोकांच्या समस्या व्यक्तीगत, कौटुंबिक तसेच सामाजिक पातळीवर सोडवण्यासाठी प्रयत्नशील असावे.भटक्या जमातीच्या बालकांना मार्गदर्शन करणारे विभाग सुरू करण्यात यावेत.

सरकारच्या समाजकल्याण विभागामार्फत भटक्या जमातीसाठी असणा-या वेगवेगळ्या योजना अवगत करून द्याव्यात. त्यासाठी बिगर सरकारी कार्यालये, स्वयंसेवक, प्रशिक्षित सामाजिक कार्यकर्ते इत्यादींनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

भटक्या जमातीच्या विकासासाठी अंमलात आणलेल्या वेगवेगळ्या योजनांची अंमलबजावणी यशस्वीरित्या झाली की नाही याचे ठराविक कालावधीनंतर मूल्यमापन करण्यासाठी समाजकल्याण विभागाने पुढाकार घ्यावा. तसेच योजना यशस्वीपणे राबवताना आलेल्या अडचणींची नोंद ठेवावी.

**निष्कर्ष :**

बहुतांशी, भटक्याजमातीना प्रगत समाजात स्थिरत्व प्राप्त झालेले नाही आणि त्याचीच परिणीती म्हणून या समाजातील लोक भीक मागणे, हीन दर्जाचे काम स्वीकारणे व परंपरागत कमी प्रतीचा व्यवसाय करणे यासारखी काम करू लागले आहेत. सद्य:स्थितीत भारतात जवळपास ७२ लाख भटक्या जमातीतील लोक उदरनिर्वाहासाठी भटकंती करीत आहेत. नैसर्गिक व खनिज संपत्तीची मुबलकता, औद्योगिक विकास सामाजिक व आर्थिक दर्जा उंचावण्याची संधी इत्यादी बाबींमुळे भटक्या जमातीतील लोक कोल्हापूर शहराकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित होताना दिसत आहेत.

भटक्या विमुक्त जमातीच्या लोकांचा सामाजिक दर्जा पाहता असे म्हणता येईल की महाराष्ट्र राज्याच्या कल्याणकारी खात्याने भटत्या जमातीचा शास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केलेला नाही. भटक्या जमातीमध्ये बंजारी. राजभोई, धनगर, वडार, रामोशी, गोंधळी इत्यादींचा समावेश केला आहे. परंतु, या जमातीतील लोकांना स्थिरत्व प्राप्त झालेले आहे. तरीसुध्दा भटक्या जमातीतील लोकांना असलेले फायदे या जातीतील लोक उपभोगत आहेत. काही नेतेमंडळी राजकीय स्वार्थापोटी भटक्या जमातीतील लोकांसाठी असलेल्या राखीव जागांसाठी हस्तक्षेप करीत आहेत. याउलट, गोसावी, गोपाळ, लुडलक्ष्मी, घिसाडी, भाराडी, भामटी, सापगारूडी, इत्यादी जमातीतील लोकांच्या शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेता आलेला नाही. भटक्या जमातीतील लोकांच्या जागा स्थिरता प्राप्त झालेल्या जातीतील लोक उपभोगत आहेत. हे संबंधित जमाती व राजकीय नेत्यांकडून होणारे नियम आणि कायद्याचे उल्लंघन आहे. त्यामुळे भटक्या जमातीतील लोक स्वत:चा आवाज उठवू शकत नाहीत. काही वेळा भटक्या जमातींना शहरामध्ये स्थिरत्व प्राप्त होत असताना दिसून येते. त्याचप्रमाणे, भटक्या जमातीतील लोक उघड्या जमिनीवर झोपडपट्टी उभारतात आणि शहरातील लोकांसाठी समस्येचे कारण बनतात.

**संदर्भ ग्रंथ :**

- कोल्हापूर जिल्हा गॅझेटिअर
- सातारा जिल्हा गॅझेटिअर
- www.gov.in